Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 3RD FEBRUARY 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या खालीं लिहिलेल्या आक्टास आलीजाह गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ४ माहे मार्च सन १८९७ रोजीं संमति दिली, आणि तो लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—**

## सन १८९७ चा आक्ट ७ वा.

**मन १८८३ चा हिंदुस्थानचा देशनिर्गमनाविषयीं आक्ट सुधारण्याकरितां आक्ट.**

ज्याअर्थीं, सन १८८३ चा हिंदुस्थानचा देशनिर्गमनाविषयीं आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) ह्या आक्टास हिंदुस्थानचा देशनिर्गमनाविषयीं आक्ट सुधारण्याकरितां सन १८९७ चा आक्ट असें ह्मणावें; आणि लहान सरनामा व सुरुवात.

(२) तो एकदम अमलांत येईल.

२. सन १८९० चा आक्ट १८ वा, कलम ७, याअन्वयें सुधारलेला सन १८८३ चा हिंदुस्थानचा देशनिर्गमनाविषयीं आक्ट, कलम १०२, ह्यांत, "ब्रिटिश वसाहतींत अगर मुलुकांत" ह्या शब्दांच्या बदला "देशांत" हा शब्द, "त्या वसाहतीच्या अगर मुलुकाच्या" ह्या शब्दांच्या बदला "त्या देशाच्या" हे शब्द, "संस्थानांत, वसाहतींत अगर मुलुकांत" ह्या शब्दांच्या बदला "संस्थानांत अगर देशांत" हे शब्द आणि "संस्थानास, वसाहतीस अगर मुलुकास" ह्या शब्दांच्या बदला "संस्थानास अगर देशास" हे शब्द दाखल करावे.

(सही) **जे. एम. म्याक्फर्सन,**
**सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.**

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.